मोहफुलविषयक समितीच्या शिफारशीनुसार मोहफुलांचे संकलन, संस्करण, साठवणूक, मूल्यवर्धन व विपणन या संदर्भात प्रस्तावित उपक्रम राबविण्याकरिता आवश्यक निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१०८/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १६ मार्च, २०१८

<u>वाचा</u> :- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३,दिनांक ३० जून, २०१७
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दिनांक ०६ फेब्रुवारी,२०१८
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/यो/इए/प्र.क्र.०५/१७-१८/१८९२,दिनांक ०९ जानेवारी, २०१८
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/यो/इए/प्र.क्र.०५/१७-१८/२३४७,दिनांक १४ मार्च, २०१८

<u>प्रस्तावना :-</u>

सन २०१७-१८ राज्य योजनेअंतर्गत वनसंरक्षण व विकास, ग्राम परिसर व आदिवासी विकास संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रम (२४०६-१५२१) या योजनेतंर्गत रू. ६०००.०० लक्ष निधी मंजूर व अर्थसंकल्पीत आहे.

सन २०१७-१८ राज्य योजनेअंतर्गत वनसंरक्षण व विकास, ग्राम परिसर व आदिवासी विकास संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रम (२४०६-१५२१) या योजनेंतर्गत अद्याप पर्यंत रु.४१८६.०० लक्षचे प्रस्तावास मान्यता प्राप्त होवून अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. सदर योजनेंतर्गत शिल्लक नियतव्ययाच्या अनुषंगाने मोहफलविषयक समितीच्या शिफारशीनुसार मोहफुलांचे संकलन, संस्करण, साठवणूक, मूल्यवर्धन व विपणन या संदर्भात प्रस्तावित उपक्रम राबविण्याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करुन देणे संबंधी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिनांक १७.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या तीन वर्षाकरिता रु.१२६०.९१ लक्षचा प्रस्ताव सादर केला असून त्याअनुषंगाने संदर्भ क्र.४ दिनांक १४ मार्च,२०१८ अन्वये सन २०१७-१८ करीता गडचिरोली, चंद्रपूर, धुळे व अमरावती प्रादेशिक वनवृत्ताकरीता ०२-मजूरी करीता रु.२८९.५२ लक्ष व २१- पुरवठा व साहित्य करीता रु.९५.८६ लक्ष अशा एकूण रु.३८५.३८ लक्ष इतक्या रकमेचा नवीन बाब प्रस्ताव प्रधान शिर्ष २४०६-१५२१, ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम अंतर्गत प्रस्ताव संदर्भ क्र.३ व ४ अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सादर करुन निधी वितरीत करण्यास शिफारसीसह विनंती केली आहे. त्यानुसार या कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

सन २०१७-१८ राज्य योजनेअंतर्गत वनसंरक्षण व विकास, ग्राम परिसर व आदिवासी विकास संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रम (२४०६-१५२१) या योजनेमधून सन २०१७-१८ करीता गडचिरोली, चंद्रपूर, धुळे व अमरावती या प्रादेशिक वनवृत्तातील मोहफलविषयक समितीच्या शिफारशीनुसार मोहफुलांचे संकलन, संस्करण, साठवणूक, मूल्यवर्धन व विपणन या संदर्भात प्रस्तावित उपक्रम राबविण्यासाठी ०२-मजूरी करीता रु.२८९.५२ लक्ष व २१- पुरवठा व साहित्य करीता रु.९५.८६ लक्ष अशा एकूण रु.३८५.३८ लक्ष इतका निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्त अनुदानाचा वापर करण्याच्या दृष्टीने (२४०६-१५२१) या लेखाशिर्षा अंतर्गत विहीत केलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे संबंधितावर बंधनकारक राहील.

१. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.
२. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अनुसार नियम पुस्तिकेच्या परिच्छेद ४०१ मध्ये नमुद केल्यानुसार निविदा प्रक्रियेत खरेदी किंमत रु.तीन लाख व त्यापेक्षा अधिक असल्यास ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.
३. प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकतेनुसार आहरण करावे.
४. उपरोक्त खर्च विहीत कार्यपध्दतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.
५. प्रस्तावित सर्व कामांना सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी आहे यांची खात्री करुनच कामे करावीत. तसेच सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८०, भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशांची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.
६. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपूरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.
७. सदर कामे करतांना कुठलेही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.
८. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ व दिनांक ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.
९. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र. १७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-१०, प्रधानशिर्ष-२४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०१ वनीकरण, १०१ वनसंरक्षण व विकास, ग्राम परिसर व आदिवासी विकास संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रम राज्य योजना(२४०६-१५२१) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ व ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय,भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१७११५६५७३०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.03.17 11:59:26 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली/चंद्रपूर/धुळे/अमरावती
५. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई-३२.
७. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
८. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
९. कार्यासन अधिकारी, फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)